दुरध्वनी क. ०२२ - २४९३१७७३
Email id – dcpzone3-mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग,
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ –३, मुंबई यांचे कार्यालय,
वरळी पोलीस ठाणे इमारत, दुसरा माळा,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई – ४०००३०.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक . १५/०६/२०२४

**"प्रेसनोट"**

**नागपाडा पोलीस ठाणे यांनी हरवलेल्या मोबाईलचा ( MISSING MOBILE ) CEIR पोर्टलच्या आधारे तसेच गुन्हयातील हस्तगत केलेल्या मोबाईल असे एकूण ५३ मोबाईलचा शोध घेवून उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत....**

नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई चे हद्दीमध्ये मोबाईल मिसिंग तसेच मोबाईल चोरी झालेबाबत पोलीस ठाणेस तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुशंगाने तात्काळ तक्रारदार यांचे मोबाईल हरविलेबाबत तसेच चोरी झालेबाबत तक्रारी नोंद करून त्यांचे मोबाईल चे आय.एम.ई.आय. प्राप्त करून ते **CEIR** या पोर्टलवरती मोबाईल ट्रेसिंगसाठी ठेवून त्यांचा तांत्रिक तपास करून सदरचे मोबाईल हे मोबाईल मिसिंग शोध पथकाचे म. पो.उपनि. धोत्रे, पो.उपनि. कदम, पोशिक्र. ०९०३८५/बोरसे, पोशिक्र. ०७०४२१/बुगले, पोशिक्र. डोंगेर, पोशिक्र. ०९१७५३/पवार, म.पो.शि बारेला या पथकाने तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. काळे, पो.उपनि. खैरावकर व पथक यांनी नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई नोंद हरवलेल्या मोबाईलचा **CEIR** या पोर्टलच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुशंगाने निरंतर पाठपुरावा करून सदर मोबाईलचे वापरकर्ते यांचा शोध घेवून मुंबई, महाराष्ट्र तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, दिल्ली, राजस्थान, पंजाब, पश्चिम बंगाल या परराज्यातून एकूण **७,९५,०००/–** रूपये किंमतीचे **एकूण ५३** मोबाईल वेगवेगळया राज्यातून हस्तगत करून आज दिनांक – १५/०६/२०२४ रोजी नागपाडा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेशकुमार ठाकूर, पोलीस निरीक्षक – संजय निंबाळकर (प्रशासन), पोलीस निरीक्षक – सोमेश्वर खाटपे (जनसंपर्क), पोलीस निरीक्षक – संतोष खांडेकर (गुन्हे) तसेच नागपाडा पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांच्या हस्ते तक्रारदार यांना परत केले आहेत. अशी वरील पथकाने उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री. अनिल पारसकर, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशीक विभाग, मुंबई, मा.श्री. कृष्ण कांत उपाध्याय, पोलीस उप आयुक्त परिमंडळ– ०३ मुंबई, मा.श्रीमती. शोभा पिसे, सहायक पोलीस आयुक्त, ताडदेव विभाग, मुंबई, श्री.महेशकुमार ठाकुर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली नागपाडा पोलीस ठाणेचे श्री. संतोष खांडेकर, पोलीस निरीक्षक, गुन्हे, सहायक पोलीस निरीक्षक– सोमनाथ काळे, पोलीस उप निरीक्षक– योगेश खैरावकर , म.पो.उ.नि. सविता धोत्रे व मोबाईल मिसिंग पथक तसेच गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी केली आहे.

*******

****Z3/15/06/2024****

Scanned with CamScanner